


दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३१६ वा | मंगळवार दि १० मार्च २०२६ | पृष्ठ ८ | किंमत३ रुपये

# बायकोच्या बॉडीजवळ रडत बसला, पोलीसही चुटपुटले, तपासात सुपारी अँगल समोर, वृषाली गावंडेंच्या घातपातामागील थरारक प्रकार

वृत्तसंस्था/बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यात पेसोडा फाट्यावर झालेल्या अपघातात शिक्षिका वृषाली गावंडे यांचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली होती. प्रथमदर्शनी अपघात वाटणारा हा प्रकार पोलिस तपासात घातपात असल्याचं समोर आलं आहे. सुपारी देऊन पत्नीची हत्या केल्याप्रकरणी पतीसह दोघा जणांना अटक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे पोलीस अपघातस्थळी पोहोचले तेव्हा पती प्रकाश गावंडे पत्नीच्या बॉडीशेजारी बसून रडत असल्याने अनेक जण भुलले होते. याआधी तीन वेळा जेवणातून विषारी औषध देऊन आरोपीने वृषाली यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकारही समोर आला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यात पातुर्डा गावात चित्रपटांपेक्षाही थरारक प्रकार समोर आला आहे. पांढऱ्या रंगाच्या टाटा इंट्रा गाडीने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार शिक्षिका वृषाली गावंडे यांचा अपघाती मृत्यू झाल्याचं समोर आलं होतं. मात्र पती प्रकाश उर्फ भय्या गावंडे याने शेगाव येथील मालवाहू वाहनाचा चालक मनीष नारायणसिंग सूर्यवंशी याला



एक लाख रुपयांची सुपारी देऊन त्याने पत्नीची हत्या घडवून आणल्याचा प्रकार पोलीस तपासात समोर आला. प्रकाश गावंडे आणि मनीष सूर्यवंशी यांना पोलिसांनी अटक केली आहे. संग्रामपूर तालुक्यातील पातुर्डा येथील रहिवासी वैशाली प्रकाश गावंडे या जळगाव जामोद तालुक्यातील पिंपळगाव काळे येथील जिल्हा परिषद शाळेवर कार्यरत होत्या. दोन मार्च रोजी कवठळ रोडवर पेसोडा फाट्याच्या पुढे त्यांना अपघात झाला. अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून पोलिसांनी तपास सुरु केला होता, परंतु शिक्षिकेचे माहेर असलेल्या जस्तगाव परिसरात हा अपघात नसून घातपात असल्याची चर्चा सुरु झाली होती. भीषण अपघाताच्या नावाखाली दडलेला खुनाचा थरारक कट उघडकीस आणण्यात जळगाव जामोद पोलिसांना मोठं यश आलं. अपघात वाटणारी घटना प्रत्यक्षात १ लाख रुपयांची सुपारी देऊन घडवून आणलेला खून असल्याचे तपासात निष्पन्न झाले. पोलिसांनी घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीदारांच्या मदतीने तपास केला असता संशयाची सुई पांढऱ्या रंगाच्या टाटा इंट्रा (एमएच २८ बीबी ५७५३) गाडीकडे वळली. ही गाडी मनीष सुर्यवंशीची असल्याचे समजताच त्याला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली, तेव्हा मनीषने या थरारक कटाची कबुली दिली. मुख्य सूत्रधार हा वृषाली यांचा पती प्रकाश अनंता गावंडे आणि त्याचा साथीदार मंगेश चुलकार , राहणार पातुर्डा असल्याचे मनीषने सांगितले. वृषाली यांना अन्नातून विष देऊ मारण्याचा तीन वेळा प्रयत्न झाला होता, मात्र तो यशस्वी झाला नसल्याचे धक्कादायक वास्तव पोलीस तपासात समोर आले. आरोपींनी मनीष सुर्यवंशीला वृषाली यांना गाडीने उडवण्यासाठी १ लाख रुपयांची सुपारी दिली होती. ठरल्याप्रमाणे २ मार्चच्या सकाळी मनीषने वृषाली यांच्या गाडीचा पाठलाग केला आणि मागून कट मारुन त्यांना खाली पाडले, यात त्यांचा जागीच मृत्यू झाला.

# ठोस निर्णयाशिवाय माघार नाही बच्चू कडूंचा सरकारला थेट इशारा...

वृत्तसंस्था/ अमरावती

आम्हाला केवळ आश्वासने किंवा तात्पुरती मलमपट्टी नको आहे. मेळघाटातील कुपोषण निर्मूलनासाठी विशेष पॅकेज, तज्ज्ञ डॉक्टरांची कायमस्वरूपी नियुक्ती आणि वनविभागाच्या कायद्यातील जाचक अटी शिथिल करून रस्ते-वीजनिर्मितीचे ठोस शासन निर्णय होत नाहीत, तोपर्यंत चिखलदऱ्यातून हटणार नाही, असा इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे. माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली निघालेली मेळघाट संघर्ष महापदयात्रा सोमवारी चिखलदरा येथे धडकणार आहे. येथे प्रशासकीय दिरंगाईविरोधात तांडव आंदोलन करण्यात येणार आहे. काटकुंभ येथून सुरू झालेली ही पदयात्रा बामादेही, डोमा, काजलडोह यासारख्या दुर्गम भागातून प्रवास करत रविवारी सलोना येथे मुक्कामी पोहोचली. चिखलदऱ्याला छावणीचे स्वरूप आंदोलनाची व्याप्ती लक्षात घेता अमरावती ग्रामीण पोलिसांनी चिखलदरा शहरात कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे. तहसील कार्यालयाला छावणीचे स्वरूप आले असून, संवेदनशील मार्गांवर बॅरिकेडिंग करण्यात आले आहे. आदिवासी युवकांसाठी स्थानिक पातळीवर रोजगार आणि आरोग्य व्यवस्थेचे सक्षमीकरण या प्रमुख मागण्यांसाठी हजारो आंदोलकांचा जत्था चिखलदऱ्यात प्रवेश करणार असून, राज्य सरकार यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. वाढता मानव-वन्यजीव संघर्ष, वाघांच्या हल्ल्यात होणारे मृत्यू



आणि ताडोब्यातील वन्यजीव कॉरिडोरला धोका निर्माण करणाऱ्या लोहारडोंगरी खाण प्रकल्पाविरोधात इको-प्रो संस्थेचे अध्यक्ष बंडू धोतरे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अन्नत्याग सत्याग्रह आंदोलन सुरू केले आहे. रविवारी, चौथ्या दिवशी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलनस्थळी लोटांगण आंदोलन करण्यात आले.ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्प ते उमरेड-कऱ्हांडला तसेच नवेगाव-नागझिरा या अतिशय संवेदनशील व्याघ्र भ्रमणमार्गातील प्रस्तावित लोहारडोंगरी लोहखनिज खाण रद्द करण्यासाठी ङ्गसेव्ह लोहारडोंगरी, सेव्ह ताडोबाफ ही ऑनलाइन मोहीम राबविली जात आहे. या मोहिमेने २५ हजारांहून अधिक स्वाक्षऱ्यांचा टप्पा पार केला आहे. बहार नेचर फाउंडेशन वर्धा, शिव छत्रपती प्रचारक मंडळ चंद्रपूर, आझाद गार्डन गुड मॉर्निंग ग्रुप चंद्रपूर, सायकल डिलर्स असोसिएशन चंद्रपूर यांनी समर्थन जाहीर केले आहे.

# विजयाचा अश्वमेध



न्यूझीलंडवर एकतर्फी मात करून भारतीय क्रिकेट संघाने टी-ट्वेंटी विश्वकरंडकावर सलग दुसऱ्यांदा नाव कोरले आहे. टी-ट्वेंटी प्रकारात सलग दोन विजेतेपदे, एक दिवसीय क्रिकेट स्पर्धेतील (चॅम्पियन्स करंडक) विजेतेपद, १९ वर्षांखालील विश्वकरंडक जेतेपद आणि महिला संघाने विश्वकरंडकाला घातलेली गवसणी... ही गेल्या अठरा महिन्यांतील कामगिरी क्रिकेटमधील भारताचे वर्चस्व दाखविणारी आहे. खेळात मोठी गुंतवणूक, प्रतिभावानांचा शोध व संधी, पोषक वातावरण, खेळाची बाजारपेठ विकसित करणे असे सगळे केल्यास यशोमालिका कशी निर्माण होते, हे भारताने क्रिकेटबाबतीत दाखवून दिले आहे. विश्वकरंडक विजेतेपद किंवा द्विपक्षीय सामन्यांतील विजय भारताला नवीन नाहीत; परंतु विजयांची सवय लागून त्यांची एक मालिकाच करण्याचा प्रकार हा गेल्या काही वर्षांतला. कोणा एका खेळाडूवर अवलंबून न राहता सांघिक कामगिरीवर भर देऊन विजय मिळविण्यासाठीच मैदानात उतरण्याची वृत्ती भारतीय संघात आता निर्माण झाली आहे. रविवारचे विश्वविजेतेपद हे त्याचेच आणखी एक द्योतक. या स्पर्धेत यजमान म्हणून विजय मिळवताना भारताने इतिहास घडविला. त्याचे श्रेय संपूर्ण संघ, कर्णधार सूर्यकुमार, मार्गदर्शक गौतम गंभीर आणि संघ व्यवस्थापन यांचे; परंतु संजू सॅमसन, अभिषेक शर्मा, ईशान किशन, जसप्रीत बुमराह हे विजयाचे शिल्पकार म्हणता येतील. सारा देश आज या विजयाचा जल्लोष साजरा करीत असला, तरी हे एका रात्रीत मिळवलेले यश नव्हे. भारतीय संघातील अनेक खेळाडूंच्या कष्टांमधून गेल्या काही वर्षांत हे सुवर्णक्षण अनुभवण्याची संधी कोट्यवधी भारतीयांना वारंवार मिळत आहे. या संपूर्ण स्पर्धेत, विशेषत: स्पर्धेच्या उत्तरार्धात भारतीय संघातील खेळाडूंनी केलेला खेळ पाहिला, तर या विश्वकरंडकावर केवळ भारताचाच हक्क होता, असे म्हणावे लागेल. एखादा सामना वगळता भारतीय खेळाडूंनी जवळपास प्रत्येक सामन्यावर आपले वर्चस्व निर्माण केले होते. अंतिम सामन्यातही त्याचेच प्रत्यंतर आले. न्यूझीलंडची गोलंदाजी पूर्णपणे निष्प्रभ ठरवून भारतीय फलंदाजांनी २५५ धावांचा डोंगर रचला होता; मात्र टी-२० मध्ये अडीचशे धावा, या नव्या पिढीतील आक्रमक फलंदाजांसाठी जणू नित्याच्या बनल्या आहेत. त्यामुळेच न्यूझीलंड हे लक्ष्य पार करू शकेल, अशी धाकधूक होती. मात्र, जसप्रीत बुमराह, हार्दिक पंड्या आणि अक्षर पटेल यांनी न्यूझीलंडला रोखले आणि विजयात आक्रमक फलंदाजीइतकाच वैविध्यपूर्ण गोलंदाजीचाही वाटा असतो, हे पुन्हा दाखवून दिले. संजू सॅमसनला या स्पर्धेत सूर गवसला आणि अखेरच्या तिन्ही सामन्यांत याच सुरात भारताचेही विजयगान साकारले. काही काळापूर्वी संजूची कामगिरी सर्वसाधारण म्हणावी अशीच होती; परंतु प्रचंड कष्ट आणि आजी-माजी खेळाडूंकडून मार्गदर्शन घेऊन त्याने केलेली चमकदार कामगिरी अनेकांना निराशेतून बाहेर पडण्याची प्रेरणा देणारी ठरेल. गेल्या काही काळापासून खेळाडूच्या वैयक्तिक कामगिरीपेक्षाही संघाचा विजय, हे एकमेव ध्येय समोर ठेवण्याचे धोरण सातत्याने सगळ्या खेळाडूंच्या मनावर बिंबवल्याने प्रत्येकाने या विजयात वाटा उचलला. त्यामुळे संपूर्ण संघच स्टार ठरला, हे मान्य करावे लागेल. या स्पर्धेपूर्वी बांगलादेशच्या खेळाडूला वगळणे आणि नंतर बांगलादेशाचे स्पर्धेतून बाहेर पडणे, या घटनाक्रमाने स्पर्धेला वेगळे वळण लागण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यातच पाकिस्ताननेही भारताशी न खेळण्याचा पवित्रा घेऊन स्पर्धेला अपशकुन करण्याचा प्रयत्न केला. मात्र, आयसीसीने कौशल्याने परिस्थिती हाताळल्याने पेच टळला आणि पुढील स्पर्धा निर्विघ्नपणे पार पडली. मात्र, ग्रहणकाळात सराव न करणे किंवा पूर्वीचे हॉटेल बदलणे यांसारखे प्रकार नव्या काळात खचितच शोभणारे नाहीत. कौशल्य आणि मेहनतीच्या बळावरच जय-पराजयाला सामोरे गेले पाहिजे, हे लक्षात घ्यावे लागेल. टी-२०च्या शैलीवर भारतीयांचे वर्चस्व निर्माण होण्याचे श्रेय इंडियन प्रीमिअर लीगला (आयपीएल) द्यावे लागेल. या प्रकारच्या क्रिकेटमध्ये शास्त्रशुद्ध खेळाला दुय्यम स्थान असल्याने दोन दशकांपूर्वी भारतात याचे आगमन झाले, तेव्हा त्याबाबत काहीशी नाके मुरडण्यात येत होती. मात्र, महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखाली भारताने टी-२०चा वर्ल्ड कप जिंकला; पाठोपाठ आयपीएलने त्याचे रंजनमूल्य आणि आर्थिक लाभ जगाच्या लक्षात आले आणि साऱ्या जगाच्या क्रिकेटचा चेहरामोहराच पालटून गेला. प्रत्येक सामन्यात चौकार-षटकारांची आतषबाजी आणि प्रचंड वेगवान खेळ आता क्रीडारसिकांच्या पसंतीस उतरला आहेच. आयपीएलने देश-विदेशातील नव्या पिढीतील गुणवत्तेला जगाचे व्यासपीठ खुले करून दिले असून, भारतालाही क्रिकेटची महासत्ता बनवले आहे. क्रिकेटचा हा कित्ता अन्य खेळांसाठी गिरवून देशात क्रीडासंस्कृती रुजवायला हवी.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पटेल तुम्ही स्वार्थी आहात की अजितदादा प्रेमी, हे दाखवून द्या; रोहित पवारांकडून नाव घेऊन आव्हान

**मुंबई :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार हे विविध शंका उपस्थित करत तपास यंत्रणांना धारेवर धरत आहेत. तसंच राजकीय दबावामुळे या विमान अपघाताची योग्य चौकशी होत नसल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. अशातच रोहित पवार यांनी राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष आणि खासदार प्रफुल्ल पटेल यांना आता खुलं आव्हान दिलं आहे. 'अपघातग्रस्त विमान ज्या कंपनीचे होते त्या व्हीएसआर कंपनीच्या मालकाच्या मुलाच्या लग्नाला तुम्ही गेला होता का आणि तिथे कोणकोणते राजकीय नेते उपस्थित होते, हे महाराष्ट्राला सांगा,' असं रोहित पवार यांनी प्रफुल्ल पटेलांना उद्देशून म्हटलं आहे.

रोहित पवार यांनी एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटलंय की, 'मिस्टर प्रफुल्ल पटेलजी (माजी केंद्रीयनागरी उड्डाणमंत्री) आपणास विनंती करतो की,



अजितदादांच्या अपघाताला/ घातपातला कारणीभूत असलेल्या व्हीएसआर कंपनीच्या मालकाचा मुलगा रोहित सिंग याचा राजस्थानमध्ये जो विवाहसोहळा पार पडला तिथे आपण गेला होतात का आणि गेला असाल तर त्या लग्नात आणखी कोणते नेते उपस्थित होते. ते कोणत्या पक्षाचे होते हे तुम्हाला माहीतच असेल ते आपण लोकांना सांगावं,' असं आवाहन रोहित पवार यांनी केलं आहे.

दरम्यान, तुम्ही स्वार्थी आहात की अजितदादा प्रेमी आहात, हे महाराष्ट्राला दाखवून द्या, उद्या पत्रकार परिषद घेऊन याबाबत स्पष्टीकरण द्याल, ही अपेक्षा आहे, असं रोहित पवार यांनी शनिवारी रात्री लिहिलेल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटलं आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघात प्रकरणाचा तपास अनेक यंत्रणांच्या माध्यमातून सुरू आहे. या यंत्रणांचा सविस्तर अहवाल आल्यानंतरच त्यावर बोलणे योग्य ठरेल,' अशी भूमिका उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी शनिवारी मांडली. पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने सिंचननगर येथील कृषी महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित 'मिनी सरस सावित्री जत्रा २०२५-२६' या जिल्हास्तरीय विक्री प्रदर्शनाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते झाले. त्या कार्यक्रमानंतर माध्यमांशी त्यांनी संवाद साधला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघात नसून, घातपात असल्याचा आरोप केला जात आहे? या प्रश्नाला उत्तर देताना सुनेत्रा पवार बोलत होत्या.उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, 'अजित पवार यांच्या विमान दुर्घटना प्रकरणाची चौकशी वेगवेगळ्या पातळ्यांवर सुरू आहे. आता प्राथमिक अहवाल आला आहे. तो काही संपूर्ण अहवाल नाही. अद्याप चौकशी पूर्ण झालेली नाही. अनेक एजन्सी तपास करीत आहेत. त्यांचा तपास पूर्ण होऊन अंतिम अहवाल आल्यानंतर यावर बोलू शकतो. सध्या यावर बोलणे उचित होणार नाही.'

दरम्यान, राज्यसभेसाठी पार्थ पवार यांना संधी देण्यात आली. यावर बोलताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या, की राज्यसभा हे उच्च सभागृह आहे. अतिशय अनुभवी लोकांचे हे सभागृह आहे. तिथे जाताना जाणकार म्हणून अनेक गोष्टी आधी शिकून घेणे आवश्यक आहे. या सर्व गोष्टी शिकून घेऊन पार्थ पवार हे येथून पुढे चांगली कामगिरी करतील, असे आई म्हणून वाटते असेही सुनेत्रा पवार म्हणाल्या.

## भारताने शांततेसाठी पुढाकार घ्यावा; अण्णा हजारे यांचे पीएम मोदींना पत्र

**अहिल्यानगर :** जगाच्या नकाशावर सध्या युद्धाचे सावट गडद होत असताना, भारताच्या अहिंसक परंपरेची आठवण करून देत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना साद घातली आहे. केवळ प्रेक्षक बनून न राहता, जगातील वाढत्या संघर्षात भारताने आता 'शांतिदूत' म्हणून पुढाकार घेण्याची हीच ती वेळ आहे, अशी ठाम मागणी करत अण्णांनी जागतिक राजकारणात भारताच्या नैतिक शक्तीचा वापर करण्याची कळकळीची विनंती केली आहे.

त्यांचे हे पत्र सध्या राजकीय वतुर्ळात चर्चेत आलं आहे.अण्णा हजारे यांनी पत्रात म्हटले आहे की, युद्धामुळे केवळ विनाश, मृत्यू आणि अस्थिरता निर्माण होते. युद्धात सर्वाधिक बळी हा निष्पाप नागरिकांचा जातो. त्यामुळे जगात वाढत चाललेल्या संघर्षांमध्ये संवाद आणि शांततेचा मार्ग शोधणे अत्यंत गरजेचे आहे. भारताची परंपरा ही अहिंसा, सत्य आणि शांततेची राहिली आहे. त्यामुळे भारताने केवळ प्रेक्षकाची भूमिका न घेता जागतिक स्तरावर शांततेसाठी पुढाकार घेणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.भारत हा जगातील सर्वात मोठा



लोकशाही देश असून अनेक देशांसोबत मैत्रीपूर्ण संबंध ठेवतो. त्यामुळे भारताने आपली नैतिक ताकद आणि राजनैतिक प्रभाव वापरून युद्धग्रस्त देशांमध्ये संवादाचे पूल उभे करावेत, अशी अपेक्षा अण्णा हजारे यांनी व्यक्त केली आहे.

युद्धातून कधीच कायमस्वरूपी समाधान मिळत नाही, तर संवादातूनच स्थैर्य आणि शांततेचा मार्ग सापडतो, असेही त्यांनी पत्रात स्पष्ट केले.जागतिक तणाव वाढत असताना भारताने तटस्थ, संयमी आणि जबाबदार भूमिका घेत आंतरराष्ट्रीय स्तरावर शांततेचे नेतृत्व करावे, असे आवाहन अण्णा हजारे यांनी पंतप्रधानांना केले आहे. त्यांच्या या पत्रामुळे पुन्हा एकदा भारताने जागतिक शांततेत मोठी भूमिका बजावावी, अशी चर्चा राजकीय आणि सामाजिक वतुर्ळात सुरू झाली आहे.

## राज ठाकरेंची घोषणा; उद्या रायगडावर जाणार

**मुंबई :** राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा उद्या २० वा वर्धापनदिन आहे. या औचित्यावर मनसेकडून सदस्य नोंदणीची मोहीम हाती घेण्यात आली असून राज ठाकरे यांनी आज सोशल मीडियाच्या माध्यमातून पदाधिकाऱ्यांना महत्त्वाचं आवाहन केलं आहे. 'आपल्या पक्षाचा उद्या वर्धापनदिन असून मराठी माणूस आणि मराठी भाषा यांच्यासाठी आक्रमकपणे लढणाऱ्या पक्षाचा आणि एका विचाराचा हा वर्धापनदिन आहे.

या निमित्ताने पक्षाची सदस्य नोंदणी १० मार्च २०२६ पासून सुरु होत आहे. उद्या ९ मार्च रोजी मी सकाळी रायगडावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून माझ्यापासून सदस्य नोंदणीची सुरुवात करत आहे. या रायगडाने महाराजांचं वास्तव्य अनुभवलंच आहे, पण 'शिवराज्याभिषेकाचा' साक्षीदार देखील हा किल्लाच. अशा पावन ठिकाणी जाऊन आपण आपली सदस्य नोंदणी सुरु करत आहोत,' असं राज ठाकरे म्हणाले.मनसे पदाधिकाऱ्यांना सदस्य नोंदणीबाबत आवाहन करताना राज ठाकरे म्हणाले की, 'आपली सदस्य नोंदणी ही महाराष्ट्र सैनिकांपुरतीच मर्यादित नाही हे मुळात लक्षात घ्या.


## साताऱ्यात पुन्हा राजकीय ट्विस्ट, झेडपी अध्यक्ष कुणाचा होणार?

**सातारा :** जिल्हा परिषद अध्यक्ष आणि पंचायत समितींच्या पदाधिकारी निवडीचा कार्यक्रम जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर केला आहे. १६ मार्चला पंचायत समितीच्या सभापती निवडी आणि २० मार्च रोजी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाची निवड होणार आहे. या पार्श्वभूमीवर महायुतीत सध्या घडामोडींना मोठा वेग आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेने आपल्या सदस्यांना गेल्या २० दिवसांपूर्वी टूरवर पाठवले आहे. ते अद्याप अज्ञातवासात असताना भाजपचे मंत्री जयकुमार गोरे यांनी झेडपीचा अध्यक्ष भाजपचाच होणार असल्याचे वक्तव्य तिसऱ्यांदा केलं आहे. पण कराड पंचायत समितीच्या सभापती पदावरून कराड उत्तरच्या आमदाराने भाजप नेत्यांनाच कोंडीत पकडल्याने झेडपी अध्यक्ष निवडीत पुन्हा मोठा ट्विस्ट आला आहे.

सातारा जिल्हा परिषदेत भाजप २७, अजितदादांची राष्ट्रवादी काँग्रेस २०, शिंदेंची शिवसेनेला १५, काँग्रेस १, स्वाभिमानी शेतकरी संघटना १ आणि १ अपक्ष, असे चित्र निकालात समोर आले. कोणत्याही पक्षाला बहुमताचा जादुई आकडा गाठता आला नाही. वरीलपैकी बंडखोर अपक्ष महिला उमेदवाराने भाजपला तर काँग्रेस आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या उमेदवाराने राष्ट्रवादी काँग्रेसला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे भाजपपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेचं पारडं जड आहे.महायुतीतील तीनही पक्ष आणि विरोधक देखील जिल्हा परिषद पंचायत समितीची निवडणूक स्वबळावर लढले. जिल्हा परिषदेचा अध्यक्ष भाजपचाच होणार, असे वक्तव्य ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे प्रचारात करत होते. मात्र निकालात समोर आलेले बलाबल पाहून भाजपचा भ्रमनिरास झाला. तरीही मंत्री गोरे यांनी सातारा झेडपीचा अध्यक्ष भाजपचाच होणार असल्याचे वक्तव्य तीन वेळा केले आहे.सातारा झेडपीचा अध्यक्ष भाजपचाच करण्यासाठी मंत्री जयकुमार गोरे यांचे जोरदार प्रयत्न सुरू असताना कराड पंचायत समितीच्या सभापती निवडीवरून भाजपमध्येच संघर्ष सुरू झाला आहे. त्याबद्दल खुद्द मुख्यमंत्र्यांकडे देखील तक्रार झाली असल्याचे समजते. कराड उत्तरमधील उमेदवाराला सभापती करण्यासाठी भाजप आमदार मनोज घोरपडे यांनी डाव टाकला आहे. त्यांच्या या पवित्र्याने कराड दक्षिणमधील भाजपचे आमदार आणि पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. अतुल भोसले यांची कोंडी झाली आहे.

## जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी राष्ट्रवादीने पहिल्यांदाच अर्ज मागवले

**मुंबई :** जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष, उपाध्यक्षपदाच्या निवडीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. पदासाठी इच्छुकांची संख्या अधिक असल्याने यंदा प्रथमच राष्ट्रवादी काँग्रेसने थेट अर्ज मागविले आहेत. ज्येष्ठ सदस्यांपैकी अनेकांनी थेट अध्यक्षपदांवर दावा केला असून, काहींनी दोन्ही पदांपैकी एकाची मागणी केली आहे. त्या अर्जांवर पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार निर्णय घेणार आहेत.जिल्हा परिषदेच्या निवडणुका झाल्यानंतर आता अध्यक्ष, उपाध्यक्ष पदाच्या निवडीकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. येत्या १८ मार्चला या



निवडणुका होतील. राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांची नुकतीच बैठक झाली. गेल्या आठवड्यात झालेल्या राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत पदाधिकारी निवडीचे सर्वाधिकार सुनेत्रा पवार यांना देण्यात आले आहेत. अध्यक्ष, उपाध्यक्षपदासाठी इच्छुकांची संख्या अधिक असल्याने थेट अर्ज मागविले आहेत. त्यानुसार इच्छुकांनी पक्षाच्या वरिष्ठांकडे अर्ज दाखल केले आहेत.जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी अजित पवार यांनी जुन्यासह नव्या उमेदवारांना अधिक संधी दिली होती. अजित पवार यांना जिल्ह्यातील प्रत्येक जिल्हा परिषदेच्या गटातील स्थिती, तेथील स्थानिक राजकारण याची खडानखडा माहिती होती. त्यामुळे पदाधिकाऱ्याने काहीही सांगितले, तरी त्याचे किती ऐकायचे आणि त्याला कोणते पद द्यायचे, हे अजितदादांना चांगलेच ठाऊक होते. ज्या तालुक्यात आमदार नाही, तेथील कार्यकर्त्यांना ताकद देण्याची त्यांची पद्धत होती. त्यानुसार त्यांनी अनेक तालुक्यांतील कार्यकर्त्यांना ताकद दिलीच; त्याशिवाय त्यांच्या पदरात पदांचे मापही टाकले; पण त्यांचे निधन झाल्याने आता कोणत्या कार्यकर्त्याला ताकद द्यायची, याचा निर्णय सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपविला आहे. त्यामुळे अर्ज मागवल्याचे सांगण्यात आले. इंदापूरचे जिल्हा परिषद सदस्य श्रीमंत ढोले यांची गटनेतेपदी निवड करण्यात आली आहे. त्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेसची नोंदणी करण्यात आली आहे.दौंड तालुक्यातून ज्येष्ठ सदस्य वीरधवल जगदाळे, माजी आमदार रमेश थोरात यांचे चिरंजीव तुषार थोरात; तसेच भोरमधून विक्रम खुटवड यांनीही अध्यक्षपदासाठी मागणी केली आहे. बारामतीचे करण खलाटे यांनी दावा केला आहे. आंबेगाव तालुक्यात दिलीप वळसे पाटील यांचे पुतणे विवेक वळसे पाटील, मुळशीतून शांताराम इंगवले यांनी अध्यक्षपदासाठी दावा करताना उपाध्यक्षपदही द्यावे, अशी मागणी केली. ज्येष्ठ सदस्या सुजाता पवार आणि मोनिका हरगुडे; तसेच इंदापूरमधून हर्षवर्धन पाटील यांच्या कन्या अंकिता पाटील यांनीही उपाध्यक्षपदासाठी मागणी केली. मावळ तालुक्यात राष्ट्रवादीचे जिल्हा परिषद, पंचायत समितीचे पदाधिकारी निवडून आले आहेत.

# पाणी मागून तरुणीच्या हाताला धरलं; पुण्यात डिलिव्हरी बॉयने मर्यादा ओलांडली, गुन्हा दाखल

**पुणे :** तहान लागल्याचा बहाणा करून डिलिव्हरी बॉयने महिलेला पाणी आणायला सांगितले. पाण्याचा ग्लास घेताच ग्राहक महिलेच्या हाताला स्पर्श करून 'तू खूप सुंदर दिसतेसङ्क असे म्हणून डिलिव्हरी बॉयने ग्राहक तरुणीचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना घडली. याप्रकारणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, शिवाजीनगरमध्ये राहणाऱ्या एका तरुणीने घरासाठी काही साहित्य मागवण्यासाठी ऑनलाईन डिलिव्हरी सेवा वापरली होती. ६ मार्च रोजी सायंकाळी सुमारे पाचच्या सुमारास संबंधित डिलिव्हरी बॉय तिच्या घरी पार्सल घेऊन आला. तरुणीने दरवाजा उघडून पार्सल स्वीकारले. त्यानंतर डिलिव्हरी बॉयने पिण्यासाठी पाणी मागितले. मानवतेच्या नात्याने तरुणीने त्याला पाणी दिले. मात्र त्याच वेळी डिलिव्हरी बॉयने मर्यादा ओलांडत तिच्या हाताला स्पर्श केला आणि ङ्कतू खूप सुंदर दिसतेसङ्क




असे म्हणत गैरवर्तन केल्याचा आरोप आहे. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे तरुणी घाबरून गेली.त्यावेळी घरात तिचे लहान बाळ आणि सासूही उपस्थित होते. हा प्रकार घडल्यानंतर तरुणीने लगेचच आपल्या पतीला सर्व सांगितले. त्यानंतर दोघांनी मिळून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदवली. तक्रारीनंतर पोलिसांनी ॲपमधील डिलिव्हरीची माहिती तपासून संबंधित डिलिव्हरी बॉयची ओळख पटवली. श्रीधर कांबळे असे आरोपीचे नाव असून त्याच्याविरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचे काही फुटेज सीसीटीव्हीतही आढळल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, आरोपीचा शोध घेण्यासाठी शिवाजीनगर पोलिसांनी तपास सुरू केला असून पुढील कारवाई केली जात आहे.घरपोच सेवा देणाऱ्या ॲप्समुळे अनेकांची कामे सोपी झाली आहेत. मात्र त्याच सेवेमधून असा धक्कादायक प्रकार पुण्यात घडल्यामुळे पुणेकरांच्या मनात भीती निर्माण झाली आहे. माणसांवर विश्वास ठेवायचा की नाही? गरजू व्यक्तींवर विश्वास ठेऊन मदत करायची की नाही? आणि ऑनलाईन सेवांचा वापर करायचा की नाही? असे अनेक प्रश्न सर्वसामान्यांच्या मनात घर करू लागले आहेत.

## आयुर्वेदिक तज्ज्ञ डॉ. मनीषा जेजुरकरांचं टोकाचं पाऊल, घरात आयुष्य संपवलं

**नाशिक :** गंगापूर रोड परिसरातील डी. के. नगर भागात राहणाऱ्या प्रसिद्ध आयुर्वेदिक तज्ञ डॉ.मनिषा जेजुरकर (वय ४०) यांनी आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. जिल्हा शासकीय रुग्णालयातील मनोविकार तज्ञ डॉ. निलेश जेजुरकर यांच्या त्या पत्नी होत्या.पोलिसांकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार मयत डॉ.मनिषा निलेश जेजुरकर या गंगापूर रोडवरील 'रेवती ब्ल्यु अपार्टमेंट', डी. के. नगर येथे वास्तव्यास होत्या. काल शुक्रवारी रोजी सकाळी ११:३० वाजेच्या सुमारास त्यांनी राहत्या घरी खिडकीच्या लोखंडी रॉडला नायलॉन दोरीच्या साहाय्याने गळफास लावून घेतला. घटनेची माहिती मिळताच त्यांना बेशुद्ध अवस्थेत दुपारी २:४० वाजता उपचारासाठी जिल्हा रुग्णालय येथे येथे दाखल करण्यात आले होते. मात्र, रुग्णालयातील डॉ. श्रावणे यांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. आत्महत्येचं नेमकं कारण अद्याप स्पष्ट होऊ शकलेलं नसून गंगापूर पोलीस याबाबत अधिक तपास करत आहेत. तर या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.नांदेड शहरात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या एका २५ वर्षीय विद्यार्थिनीने वसतीगृहात गळफास घेऊन आत्महत्या केली. शुक्रवारी दुपारी हडको परिसरात ही घटना घडली. आकांक्षा मंजाजी गायकवाड असं या तरुणीचं नाव आहे. 'वसतीगृहाची फीस थकल्याने वसतीगृहचालक तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश चिटणीस जीवन घोगरे हे मानसिक त्रास देत होते, या त्रासाला कंटाळून तिने आत्महत्या केली,' असा आरोप पीडित कुटुंबीयाने केला. त्यानुसार शुक्रवारी रात्री ग्रामीण पोलिस ठाण्यात राष्ट्रवादीच्या नेत्याविरोधात आत्महत्येस प्रवृत्त करणे आणि ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, आकांक्षा गायकवाड ही हडको येथील शामराव कदम होमिओपॅथिक महाविद्यालयातील द्वितीय वर्षाचं शिक्षण घेत होती.



## अल्पवयीन मुलीशी तीन वर्षे संबंध..

**डोंबिवली :** मैत्री, प्रेम आणि त्यानंतर लग्नाचं आमिष दाखवून एका अल्पवयीन मुलीचे शोषण करणाऱ्या तरुणाचा डाव अखेर फसला आहे. डोंबिवलीतील विष्णूनगर पोलिसांनी या प्रकरणात अरमान शेख नावाच्या आरोपीला अटक केली आहे. व्यवसायाने टेलर असलेल्या अरमानने तीन वर्षे प्रेमसंबंध ठेवून तरुणीला लग्नासाठी भिवंडीत बोलावले होते, मात्र तिथे हिंदूत्ववादी कार्यकर्त्यांनी धाड टाकल्याने हे प्रकरण थेट पोलीस ठाण्यात पोहोचले.मिळालेल्या माहितीनुसार, डोंबिवली परिसरात राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीशी आरोपी अरमान शेख याने सोशल मीडियावरील व्हिडिओच्या माध्यमातून मैत्री केली होती. ही मैत्री हळूहळू प्रेमात बदलली. गेल्या तीन वर्षांपासून त्यांच्यात प्रेमसंबंध होते. अरमानने या मुलीला ती १८ वर्षांची झाल्यावर लग्न करू, असे वचन दिले होते. त्यानुसार मुलीचे वय १८ होताच त्याने लग्नाची तयारी केली.लग्नासाठी अरमानने पीडितेला भिवंडीतील शांतीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बोलावले होते. तिथे मुस्लिम पद्धतीने निकाह करण्यासाठी काजी आणि साक्षीदारही उपस्थित होते. एका हिंदू संघटनेच्या कार्यकर्त्यांना याची कुणकुण लागली होती.

## एका महिन्यात ३ वेळा विक्री, ३ वेळा लग्न... बीडच्या तरुणीचा छळ

**बीड :** जिल्ह्याला हादरवून सोडणारी आणि माणुसकीला काळिमा फासणारी एक संतापजनक घटना समोर आली आहे. एका २१ वर्षीय विवाहित तरुणीला पैशांच्या लालसेपोटी केवळ एका महिन्यात तब्बल तीन वेळा विकण्यात आले. या अमानुष प्रकाराला कंटाळून पीडितेने विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला असून, सध्या ती मृत्यूशी झुंज देत आहे. मूळची लातूर जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या या तरुणीचे लग्न दोन वर्षांपूर्वी झाले होते. मात्र, पतीच्या त्रासामुळे ती माहेरी राहत होती. याच काळात तिची ओळख पुण्यातील महानंदा नावाच्या महिलेशी झाली. महानंदाने तुझे दुसरे लग्न लावून देते, असे आमिष दाखवून तिला पुण्यात नेले. मात्र, हा मदतीचा हात नसून एका मोठ्या मानवी तस्करीच्या जाळ्याचा हिस्सा होता.पीडितेच्या असहायतेचा फायदा घेत आरोपींनी तिला एखाद्या वस्तूंप्रमाणे विकायला सुरुवात केली, पहिली विक्री पुण्यातील अमर कालभोर नावाच्या व्यक्तीकडून ५ लाख रुपये घेऊन तिचे पहिले बळजबरीने लग्न लावून दिले. दुसरी विक्री, पहिल्या लग्नाला १० दिवसही पूर्ण झाले नसताना, तिला तिथून





काढून दुसऱ्या एका व्यक्तीला ४.५ लाख रुपयांत विकले गेले. त्यानंतर तिसरी विक्री ४ मार्च २०२६ रोजी तुळजापूरच्या एका महिलेच्या मदतीने बीडमधील आष्टी तालुक्यातील कानडी बुद्रुक येथील एका व्यक्तीशी तिचे तिसरे लग्न लावून देण्यात आले. या व्यवहारातूनही आरोपींनी ४.५ लाख रुपये उकळले.इतके अत्याचार होऊनही आरोपींची पैशांची हाव संपली नव्हती. ६ मार्च रोजी आरोपींनी पीडितेला पुन्हा फोन केला आणि चौथ्या लग्नासाठी तयार राहा पजलअशी धमकी देत दबाव टाकला. या सततच्या मानसिक आणि शारीरिक छळाला कंटाळून, तसेच भविष्यातील अंधकारमय आयुष्याच्या भीतीने पीडितेने विषारी औषध प्राशन करून आपले जीवन संपवण्याचा प्रयत्न केला. सध्या तिच्यावर मिरजगाव येथील रुग्णालयात उपचार सुरू असून तिची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे.

## पुन्हा टोळी युद्धाचा भडका, वर्चस्वाच्या वादातून गंगाधाम रोडवर गोळीबार

**पुणे :** पुण्यात पुन्हा एकदा टोळी युद्धाचा भडका उडालेला बघायला मिळत आहे. या टोळीयुद्धात शुक्रवारी रात्री गोळीबाराची घटना घडली. या गोळीबारात एका तरुणाच्या पाठीत गोळी लागली. या घटनेमुळे तरुण गंभीर जखमी जाला आहे. पुण्याच्या गंगाधाम रोडवर शुक्रवारी उशिरा रात्री गोळीबाराची थरारक घटना घडली. दोन गटांतील जुन्या वैमनस्यातून हा प्रकार घडल्याचे समोर आले आहे. हल्लेखोरांनी एका तरुणाला लक्ष्य करून पिस्तुलातून गोळी झाडली. मात्र नेम चुकल्याने गोळी दुसऱ्याच तरुणाच्या पाठीत लागली. मार्केटयार्ड परिसरातील वखार महामंडळाकडून गंगाधामकडे जाणाऱ्या रस्त्यावर रात्री साडेअकराच्या





सुमारास हा प्रकार घडला. या गोळीबारात मोझेस शेकापूरे उर्फ मोज्या (वय २२, रा. मिनाताई ठाकरे वसाहत, गुलटेकडी) हा जखमी झाला. गोळी त्याच्या पाठीत घुसली असून त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या त्याच्यावर उपचार सुरू आहेत.मिनाताई ठाकरे वसाहतीत बालाजी उमाप, राम उमाप आणि त्यांच्या साथीदारांचा शेकापूरे गटाशी जुना वाद असल्याची माहिती आहे. परिसरात वर्चस्वाच्या कारणावरून दोन्ही गटांमध्ये यापूर्वीही अनेकदा भांडणे झाली होती. काही दिवसांपूर्वी अल्पवयीन मुलांनी हवेत गोळीबार केल्याचा प्रकारही चर्चेत आला होता. शुक्रवारी दुपारच्या सुमारास बालाजी उमाप आणि अमित शेकापूरे यांच्यात पुन्हा वाद झाला होता. त्यानंतर रात्री अमितचा भाऊ मोझेस शेकापूरे आणि त्याचा मित्र दुचाकीवरून वखार महामंडळाकडून गंगाधामच्या दिशेने जात होते. तेव्हा बालाजी उमाप, राम उमाप आणि त्यांच्या चार ते पाच साथीदारांनी दुचाकींवर येत दोघांना रस्त्यात अडवले.यावेळी अचानक पिस्तूल काढून गोळीबार करण्यात आला. त्यातील एक गोळी मोझेस शेकापूरेच्या पाठीत लागली आणि तो खाली कोसळला. हा प्रकार घडताच हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले.

पोलिसांच्या प्राथमिक तपासात हल्लेखोरांचा मुख्य निशाणा शेकापूरेचा मित्र होता, अशी माहिती समोर येत आहे. मात्र गोळीबारात चुकीच्या व्यक्तीला गोळी लागल्याने शेकापूरे जखमी झाला. या प्रकरणी मार्केटयार्ड पोलीस ठाण्यात बालाजी उमाप, राम उमाप आणि त्यांच्या साथीदारांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत जगताप पुढील तपास करत आहेत.

# सलग दोन वर्ल्डकप जिंकणारा पहिला संघ

# टीम इंडिया पुन्हा एकदा ‘चॅम्पियन’





**फायनलमध्ये न्यूझीलंडचा उडवला धुव्वा**

अहमदाबाद (वृत्तसंस्था) : [illegible]

**टीम इंडियाचा ऐतिहासिक विजय**

[illegible]

## संजू सॅमसनची अर्धशतकांची हॅट्रिक



[illegible]

## वर्ल्डकपमध्ये अभिषेक शर्मांचे वेगवान अर्धशतक



[illegible]

**संजू, इशानचा धमाका**

[illegible]

# ऑस्ट्रेलियन ग्रां प्रिमध्ये रसेल विजेता



मेलबर्न : [illegible]

# न्यूझीलंडचा झिंबाब्वेवर ८ गड्यांनी विजय




[illegible]

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# वडिलांच्या निधनानंतर कर्ज फेडण्यासाठी निकी अनेजानं केल्या मालिका, अपघातानं बदललं आयुष्य

**मुंबई :** ९० च्या दशकाच्या सुरुवातीला अभिनेत्री निकी अनेजानं स्वबळावर इंडस्ट्रीमध्ये नाव कमावलं. तिच्या हास्याची आणि लूकची तुलना अनेकदा माधुरी दीक्षितसोबत केली जायची. निकी अनेजाचं इंडस्ट्रीतील पदार्पण इतर कलाकारांसारखं नव्हतं. निकीला पायलट बनण्याचं प्रशिक्षण घेण्यासाठी ह्युस्टनला जायचं होतं, परंतु तिच्या वडिलांनी परवानगी दिली नाही. स्वप्न पूर्ण करण्यासाठी, निकीने तिचा भाऊ परमीत सेठीच्या घरी गुपचूप एक पोर्टफोलिओ शूट केलं, तिनं अर्चना पूरण सिंगचे कपडे घातले. शूट दरम्यान, प्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट मिकी कॉन्ट्रॅक्टरने तिला पाहिलं आणि ती माधुरी दीक्षितसारखी दिसते असं म्हटलं.सिद्धार्थ कन्ननला दिलेल्या मुलाखतीत निकी म्हणालेली की, 'पहिल्याच शॉटपासून मला 'माधुरी दीक्षित' असा टॅग लावण्यात आलेला.' त्यानंतर लवकरच, एका ज्वेलरी ब्रँडने तिला जाहिरातीसाठी विचारलं. निकी त्यावेळी कॉलेजमध्ये होती. या काळात, तिला मुंबईतील मिठीबाई कॉलेजने सियोल येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थी स्पर्धेत पाठवलं. तिथे तिनं उपविजेतेपद पटकावलं. तिथून परतल्यानंतर काही वेळातच, निकी अनेजाला चित्रपट निर्माते पहलाज निहलानी यांचा फोन आला. पण, अभिनेत्रीच्या वडिलांनी नकार दिलेला. पण, निकीनं हार मानली नाही आणि १९९४ च्या 'मिस्टर आझाद' चित्रपटात अनिल कपूर यांच्यासोबत भूमिका साकारली.मिस्टर आझाद' या चित्रपटाच्या






शूटिंगदरम्यान, निकीला कास्टिंग काऊचचा सामना करावा लागला. निकीनं सांगितलेलं की, तिला रात्री ११ वाजेपर्यंत डिस्ट्रिब्युटर्ससोबत जेवणासाठी जायला सांगितलं. तिने निर्माता पहलाज निहलानी यांनाही विचारलं की तिला का घेऊन जात आहेत? त्यावर ते म्हणाले, 'तुझा चित्रपट विकायला नकोय का?' 'मी त्यांना म्हटलं मग, म्हणून मी त्याला सांगितलं की जर अनिल कपूरला साइन करूनही तुम्ही चित्रपट विकू शकत नसाल तर काय अर्थ आहे? असं निकी म्हणालेली. त्यानंतर अभिनेत्रीचा दिग्दर्शक आणि निर्मात्यांसोबत वाईटपणा आला.पुढे, निकी अनेजानं 'येस बॉस' हा चित्रपट साइन केला होता, पण नंतर तिच्या आयुष्यात एक मोठी दुर्घटना घडली. तिच्या वडिलांचं निधन झालं आणि तिला कळलं की कुटुंबावर मोठं कर्ज आहे, ज्याबद्दल तिला पूर्वी माहिती नव्हतं. कौटुंबिक कर्ज आणि जबाबदाऱ्यांचा ताण होता, म्हणून निक्की टेलिव्हिजनकडे वळली. हा निर्णय तिच्यासाठी योग्य ठरला. काही वर्षांतच निकी अनेजानं एकाच वेळी सहा-सात टीव्ही शोमध्ये मुख्य भूमिका साकारल्या. या काळात, निकी अनेजानं शाहरुख खान आणि जुही चावलाचे स्टेज शो होस्ट करण्यास सुरुवात केली.जेव्हा निकी अनेजाची टीव्ही कारकीर्द शिखरावर होती, तेव्हा एक मोठी दुर्घटना घडली. 'घरवाली उपरवाली'च्या शूटिंगदरम्यान, एका ज्युनियर आर्टिस्टची गाडी चुकून तिच्यावर आदळली आणि ती गंभीर जखमी झाली. या अपघातात निकीला गंभीर दुखापत झाली आणि तिला एका महिन्यापेक्षा जास्त काळ रुग्णालयात राहावं लागलं. या काळात तिचे पाचही टीव्ही शो रद्द करण्यात आले.या अपघातामुळे निकी अनेजाच्या आयुष्यात मोठा बदल झाला. फेब्रुवारी २००२ मध्ये, तिनं सनी वालियाशी लग्न केलं आणि ती युकेला गेली. सामान घेण्यासाठी ती काही काळ मुंबईत असताना, तिला दिग्दर्शक अजय सिन्हा यांचा फोन आला. त्यांनी तिला झी टीव्हीवरील 'अस्तित्व...एक प्रेम कहानी' या कार्यक्रमात डॉ. सिमरनची भूमिका देऊ केली. निकीने ही भूमिका स्वीकारली आणि २००२ ते २००६ पर्यंत युके आणि भारत दरम्यान प्रवास केला. या काळात तिचा पतीही शूटिंगदरम्यान तिच्यासोबत राहण्यासाठी भारतात यायचा. त्यानंतर अभिनेत्री आई झाली आणि तिनं मुलांचा सांभाळ करण्यासाठी ब्रेक घेतला.

२०१७ मध्ये निकीनं 'दिल संभल जा जरा' या मालिकेतून पुन्हा पदार्पण केलं. त्यानंतर निकीनं अनेक मालिका आणि सिनेमांमध्ये काम केलं आहे.


## अल्लू अर्जुनची पत्नीला कोट्यवधीची मर्सिडीज-बेंझ कार गिफ्ट



**मुंबई :** दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील स्टार अभिनेता अल्लू अर्जुन याचा धाकटा भाऊ अल्लू शिरीष नुकताच विवाहबंधनात अडकला. विशेष म्हणजे याच दिवशी अल्लू अर्जुन यानं त्याच्या लग्नाचा १५ वा वाढदिवसही साजरा केला. लग्नाच्या १५ व्या वाढदिवसानिमित्त अल्लू अर्जुन यानं पत्नीला एक खास गिफ्ट दिलं आहे. या महागड्या गिफ्टची चांगलीच चर्चा सुरू आहे.अल्लू अर्जुनने आपल्या लग्नाच्या १५ व्या वाढदिवसानिमित्त पत्नी स्नेहा रेड्डीला एक अत्यंत महागडी आणि आलिशान मर्सिडीज-बेंझ कार भेट दिली आहे. या कारची किंमत तब्बल १.८१ कोटी रुपये असल्याचं सांगण्यात येत आहे.६ मार्च रोजीअल्लू अर्जुन आणि स्नेहा रेड्डी यांच्या लग्नाचा १५ वा वाढदिवस होता. योगायोगानं याच दिवशी अल्लू अर्जुनचा लहान भाऊ अल्लू शिरीष याचा विवाह सोहळा देखील पार पडला. या दुहेरी आनंदाच्या प्रसंगी, अल्लू अर्जुननं स्नेहासाठी हे खास सरप्राईज प्लॅन केलं होतं. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमध्ये, अल्लू अर्जुन आपल्या वडिलांच्या म्हणजेच अल्लू अरविंद यांच्या उपस्थितीत स्नेहाच्या हातात नवीन कोऱ्या कारची चावी देताना दिसत आहे. ही आलिशान काळी मर्सिडीज पाहून स्नेहा भारावून गेली आणि तिनं प्रेमानं आपल्या पतीला मिठी मारून त्याचे आभार मानले. केवळ महागडी भेटच नाही, तर अल्लू अर्जुननं इंस्टाग्रामवर स्नेहासाठी एक छान अशी पोस्ट लिहिली आहे. त्यानं म्हटलं की, 'लग्नाच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा, क्यूटी! लग्नाची १५ वर्षे पूर्ण झाली आहेत. तुझ्याशिवाय हा प्रवास इतका सुंदर झाला नसता.' स्नेहानं देखील त्यांच्या १५ वर्षांच्या सहवासातील आठवणी शेअर करत आपल्या कुटुंबाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.अल्लू अर्जुनला लक्झरी गाड्यांची प्रचंड आवड आहे. त्याच्या ताफ्यात आधीच अनेक महागड्या गाड्यांचा समावेश आहे. यात रॉल्स रॉयस कलिनन ज्याची किंमत साधारण ७ कोटी रुपये आहे. तर रेंज रोव्हर वोग, जॅग्वार दगड फाल्कन अशा अनेक गाड्या आहेत. तर त्याची व्हॅनिटी वॅनही आहे, ज्याची किंमत साधारण ७ कोटींच्या आसपास असल्याचं म्हटलं जातं. सध्या अल्लू अर्जुनचे चाहते सोशल मीडियावरून या लाडक्या जोडीवर शुभेच्छांचा वर्षाव करत आहेत.

## अफेअरच्या चर्चांवर त्रिशा कृष्णनने सोडलं मौन

**मुंबई :** दाक्षिणात्य सुपरस्टार थलापती विजय गेले काही दिवस त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. त्याची पत्नी संगीता हिने नुकतीच त्याच्याविरुद्ध न्यायालयात घटस्फोटाची याचिका दाखल केली. हे करताना तिने त्याच्यावर एका अभिनेत्रीसोबत प्रेमप्रकरण असल्याचा आरोप केला. २७ वर्षांच्या संसारानंतर त्यांचे नाते एका कठीण टप्प्यातून जात आहे. अशातच साऊथ अभिनेत्री त्रिशा कृष्णन हिचे सतत विजयसोबत असणे लोकांना खटकत असून, संगीताने आरोप केलेली अभिनेत्री त्रिशाच असणार असा दावा युझर्स सोशल मीडियावर करतायत. त्रिशा आणि विजय यांना अलीकडेच एका रिसेप्शन पार्टीत एकत्र पाहिले गेले.विजय आणि त्रिशा यांना एकत्र पाहून चाहते आश्चर्यचकित झाले. सोशल मीडियावर लोकांनी त्रिशावर जोरदार टीका केली.



आता, त्रिशाने या वादावर प्रतिक्रिया दिली आहे. तिने ट्विटर अकाउंटवर एक पोस्ट शेअर केली आहे आणि या अफवांवर मौन सोडले आहे. त्रिशाने विजयसोबत कार्यक्रमात एकत्र उपस्थित राहण्याचे सत्य उघड केले आहे.त्रिशाने लिहिले, 'मला शेवटच्या क्षणी आयोजकांनी माझ्या सहाय्यकाद्वारे एका कार्यक्रमात उपस्थित राहण्यास सांगितले होते. मी शेवटच्या क्षणी सहभागी झाले. मायक्रोफोन एखाद्या व्यक्तीचे विधान बुद्धिमान किंवा विनोदी बनवत नाही. ते फक्त मूर्खपणा दाखवते. कोणत्याही माहितीशिवाय वापरलेले चुकीचे शब्द, जे एखाद्या व्यक्तीला लक्ष्य करत असतात हे त्याच्यापेक्षा ते वापरणाऱ्याची नियत जास्त दाखवतात. गलाट्टा अवॉर्ड्सच्या एका कार्यक्रमात निमति पार्थिवन यांना त्रिशाबद्दल विचारण्यात आले. त्यांना त्यांनी यापूर्वी काम केलेल्या विविध अभिनेत्रींचे फोटो दाखवण्यात आले. त्रिशाचा फोटो दाखवला असता त्यांनी सांगितले की हिने काही दिवस घरीच राहावे. तिने बाहेर न जाणेच चांगले. पण, त्रिशाच्या विधानानंतर पार्थिमानने ट्विटरवर तिची माफी मागितली.विजय आणि त्रिशा एका रिसेप्शनमध्ये एकत्र आले. विजयने फुलांचा गुच्छ हातात घेतला, तर त्रिशाने पाहुण्यांशी हस्तांदोलन केले. विजय आणि त्रिशा नवविवाहित जोडप्यासोबत फोटो काढताना दिसले.

## वैयक्तिक अडचणी स्वत: सोडवीन, काळजी करू नका

**मुंबई :** अभिनेता आणि राजकारणी विजय गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. सुपरस्टार विजयची पत्नी संगीतानं घटस्फोटासाठी अर्ज दाखल केल्यानंतर अभिनेता त्रिशा कृष्णनसोबत एका रिसेप्शनमध्ये दिसला. विजय, शनिवारी मम्मल्लापुरम येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या समरंभात उपस्थित होता. यादरम्यान त्यानं महिलांसाठी विशेष कल्याणकारी योजनांची घोषणा केली. त्याचबरोबर अभिनेत्यानं त्याच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल होणाऱ्या चर्चेबद्दलही भाष्य केलं आहे.तमिलगा वेत्री कझगम (टीव्हीके) प्रमुख थलापती विजयनं महिला दिनानिमित्त विशेष भाषण केलं. यादरम्यान घटस्फोटाचा किंवा त्रिशासोबतच्या अफेअरच्या चर्चांना उल्लेख न करता विजय म्हणाला, 'माझ्याबद्दलच्या अलिकडच्या अडचणींबद्दल काळजी करू नका.' विजय पुढे म्हणाला की, हे मुद्दे चर्चा करण्यासारखे नाहीत. अभिनेत्यानं चाहत्यांना आश्वासन दिलं की, तो या गोष्टी वैयक्तिकरित्या हाताळेल.पुढे विजय म्हणाला, 'हे मुद्दे तुमचे नाहीत. मी स्वतः त्यांची काळजी घेईन. अलीकडे काही समस्या आल्या आहेत. मी पाहतोय की तुम्हीही दुःखी आहात. तुम्हा सर्वांना दुःखी पाहून मला वाईट वाटतंय. मी माझ्या वैयक्तिक अडचणी स्वतः सोडवीन. काळजी करू नका. काळजी करण्यासारखं काहीही नाही. जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र काम केलं पाहिजे.'दरम्यान, थलापती विजयची पत्नी संगीताने अभिनेत्याविरुद्ध घटस्फोटाची याचिका दाखल केली आणि त्याच्यावर गंभीर आरोप केले. विजयचं दुसऱ्या अभिनेत्रीसोबत अफेअर असल्याचं याचिकेत संगीतानं म्हटलं आहे. त्याचबरोबर संगीताने न्यायालयात एक नवीन याचिका दाखल केली, ज्यामध्ये तिच्या सासरच्या लोकांसोबत राहण्याचा अधिकार मिळावा अशी मागणी केली.विजयच्या कामाबद्दल सांगायचं तर तो 'जन नायकन' या त्याच्या शेवटच्या सिनेमात दिसणार आहे. अभिनेत्यानं त्याचा राजकीय पक्ष, तमिळगा वेत्री कळघम (टीव्हीके) ची स्थापना करण्याची घोषणा केली आणि २०२६ च्या तामिळनाडू विधानसभा निवडणुका लढवणार असं सांगितलं.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सैलानी येथून आणलेल्या अनोळखी वृद्धाचा मृत्यू ओळख पटविण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

सैलानी येथून एक अनोळखी इसम (वय अंदाजे ८० वर्षे) यास दि. ७ मार्च २०२६ रोजी सकाळी सुमारे ११ वाजताच्या सुमारास सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथे उपचारासाठी आणण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर संबंधित इसमास मृत घोषित केले. सदर मृत व्यक्तीची ओळख पटलेली नसून त्याचा मृतदेह सामान्य रुग्णालय, बुलढाणा येथील शवागारात ठेवण्यात आला आहे. मृत व्यक्तीजवळ कोणतीही ओळख पटविणारी कागदपत्रे किंवा नातेवाईक नसल्यामुळे त्याची ओळख पटविण्यासाठी तसेच नातेवाईक, मित्रमंडळी किंवा परिचित व्यक्तींचा शोध घेण्यासाठी बुलढाणा पोलीसांनी नागरिकांना आवाहन केले आहे. मृत व्यक्तीचे वय अंदाजे ८० वर्षे, रंग सावळा, उंची अंदाजे ५ फूट ३ इंच, अंगात पांढऱ्या रंगाचा शर्ट व पिवळ्या रंगाची टी-शर्ट, पाढऱ्या रंगाची पॅन्ट व निकर आहे. उजव्या हातात लाल रंगाचा धागा असून कमरेला पंचरंगी दोरा आहे. सदर व्यक्तीची ओळख पटल्यास किंवा त्याबाबत कोणाला काही माहिती असल्यास बुलढाणा पोलीस ठाणे येथे किंवा मो.क्रमांक ९६२३२४३७३३ वर संपर्क साधावा, असे आवाहन पो. हे. कॉ. नरेन्द्र रोटे (ब. नं. १२०) यांनी केले आहे.

# विधी सेवा महाशिबिरात एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ

**जनसंचलन/बुलढाणा**

चिखली तालुक्यातील अमडापूर येथे आयोजित विधीसेवा महाशिबिर व शासकीय योजनांच्या महामेळाव्यात बुलढाणा जिल्ह्यातील एचपीव्ही () लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. हा शुभारंभ उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूरचे प्रशासकीय न्यायमूर्ती अनिल किलोर यांच्या हस्ते पार पडला. यावेळी उच्च न्यायालय मुंबईचे न्यायमूर्ती एम. एम. नेरलीकर, जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बुलढाणाचे अध्यक्ष आर. एन. रोकडे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी खरात, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे, शीतल साखळीकर () तसेच विविध विभागांचे खातेप्रमुख अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व, गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून होणारे संरक्षण तसेच मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने या मोहिमेचे महत्त्व याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. महाशिबिराच्या निमित्ताने विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात आले. सिकल सेल तपासणी अंतर्गत १०० लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली, तर महिला दिनानिमित्त ३०० महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच आयुष कार्यक्रमांतर्गत वनौषधीविषयीची १०० पुस्तके लाभार्थ्यांना वितरित करण्यात आली. विधीसेवा महाशिबिराच्या माध्यमातून विविध शासकीय योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आली. हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात व मोठ्या उपस्थितीत पार पडला

# आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त जिल्हास्तरीय अस्मिता लीग क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

**जनसंचलन/बुलढाणा**

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून युवक कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, यांच्या मार्गदर्शनाखाली मेरा युवा भारत ( ) व जिल्हा क्रीडा कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ मार्च २०२६ रोजी सकाळी ८ वाजता तालुका क्रीडा संकुल, चिखली (ता. चिखली, जि. बुलढाणा) येथे जिल्हास्तरीय ङ्कअस्मिता लीगफ्फ क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत १३ ते १८ वर्षांवरील मुली तसेच महिला यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्पर्धांमध्ये १०० मीटर, २०० मीटर व ४०० मीटर धावणे या क्रीडा प्रकारांसह विविध मनोरंजनात्मक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या. महिलांचे मनोबल वाढवण्यासाठी चिखली मतदारसंघाच्या आमदार श्वेताताई महाले कार्यक्रमास उपस्थित होत्या. तसेच नगराध्यक्ष पंडित दादा देशमुख,



उपनगराध्यक्षा सौ. वैशालीताई खेडेकर, सहायक क्रीडा विकास अधिकारी अनुराधाताई सोळंकी, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त मान्यवर तसेच लेखाधिकारी रमेश अहिरकर, आकाश चाफेकर आदी उपस्थित होते. यावेळी खेलो इंडिया प्रशिक्षक अक्षय गोलांडे, आकाश साळोक, तसेच अनेक महिला व क्रीडाप्रेमी उपस्थित होते. जिल्ह्यातील मोठ्या संख्येने मुली व महिलांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल जिल्हा युवा अधिकारी प्रणीत सांगवीकर व जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी सहभागी सर्व महिला व मुलींचे आभार मानत महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# स्वाधार योजनाचे अर्ज १५ मार्चपर्यंत जमा करण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना अंतर्गत शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १५ मार्च २०२६ पर्यंत निश्चित करण्यात आली आहे, अशी माहिती सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, बुलढाणा यांनी दिली आहे. सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी पात्र असलेल्या तसेच वसतिगृहासाठी अर्ज करूनही प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील इयत्ता ११ वी, १२ वी तसेच १२ वी नंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला जातो. विद्यार्थ्यांना शिक्षण सुरू ठेवता यावे यासाठी भोजन, निवास व इतर शैक्षणिक खर्चासाठी आवश्यक आर्थिक मदत थेट विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येते. दि. ६ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये ही योजना सुरू करण्यात आली असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना लाभ मिळावा यासाठी दि. २६ डिसेंबर २०२४ च्या शासन निर्णयान्वये या योजनेचा विस्तार तालुकास्तरावर करण्यात आला आहे. शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी ऑनलाईन अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांनी अर्जातील सर्व माहिती अचूक भरून तो ऑनलाईन पद्धतीने कार्यालयाकडे पाठवावा. तसेच ज्यांचे अर्ज करण्यात आले आहेत. त्यांनी अर्जातील त्रुटी दुरुस्त करून विहित वेळेत पुन्हा सादर करावेत. अर्ज फॉरवर्ड करण्यापूर्वी बँक खाते क्रमांक, कोड, खातेधारकाचे नाव इत्यादी तपशील अचूक भरावेत, जेणेकरून लाभाची रक्कम वेळेत जमा करता येईल. याशिवाय ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज केला आहे परंतु अर्जाची हार्डकॉपी व आवश्यक कागदपत्रे अद्याप कार्यालयात जमा केलेली नाहीत, त्यांनी ती १५ मार्च २०२६ पर्यंत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, बुलढाणा येथे जमा करावीत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मनोज मेरत यांनी केले आहे.

# लाखो भाविकांच्या उपस्थितीत सैलानी बाबांची संदल यात्रा उत्साहात

**जनसंचलन/बुलडाणा**

लाखो भाविकांच्या उपस्थितीत सैलानी बाबांची संदल यात्रा उत्साहात संदलनिमित्त पिंपळगाव सराईमध्ये झालेली भाविकांची गर्दी व निघालेला संदल. रविवारी रात्री ११:३० ला सैलानीत पोहोचला संदल लोकमत न्यूज नेटवर्क सर्वधर्मीयांचे पिंपळगाव सराई श्रद्धास्थान मानल्या जाणाऱ्या हाजी अब्दुल रहमान उर्फ सैलानी बाबा यांच्या वार्षिक संदल यात्रेला शनिवारी (दि. ८) लाखो भाविकांच्या उपस्थितीत उत्साहात सुरुवात झाली. पिंपळगाव सराई येथून रात्री ९ वाजता संदल मिरवणूक निघाली आणि रविवारी रात्री सुमारे साडेअकरा वाजता सैलानी बाबांच्या दर्यावर संदल अर्पण करण्यात आला. परंपरेनुसार, मुजावर परिवाराच्या उपस्थितीत पिंपळगाव सराई येथील संदल घरात धार्मिक विधी पार पडले. त्यानंतर सजवलेल्या उंटणीवर संदल ठेवण्यात आला. ढोल ताशांच्या निनादात आणि आतषबाजीत संदल पालखीची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी भाविक मोठ्या श्रद्धेने सहभागी झाले होते. महिलांसह युवकांनीही पारंपरिक वाद्यांच्या तालावर उत्साहाने सहभाग घेतला. पिंपळगाव सराई गावाजवळील डोंगराच्या जुन्या पाणंद रस्त्याने हजारो भाविकांच्या समवेत सैलानीत पोहोचला संदल पायथ्याशी सैलानी बाबांचा दर्गा असून, दरवर्षी येथे मोठ्या भक्तिभावाने संदल यात्रा साजरी केली जाते. या यात्रेसाठी राज्यासह देशाच्या विविध भागांतून भाविक उपस्थित राहतात. मिरवणूक जुन्या पाणंद रस्त्याने पुढे सरकत दर्गा परिसरात पोहोचली. तेथे पारंपरिक पद्धतीने धार्मिक विधी पार पडल्यानंतर संदल दर्यात चढवण्यात आला. दर्गा परिसरात शेख रफिक मुजावर, शेख हाशम मुजावर, शेख शफीक मुजावर, शेख चांद मुजावर, शेख कदीर मुजावर, तसेच इतर मुजावर यांच्या हस्ते सैलानी बाबांच्या समाधीवर संदल अर्पण करण्यात आला.

# हॉटेलमध्ये ग्राहकांना मारहाण; गुन्हा दाखल

**जनसंचलन/बुलढाणा**

खामगाव-शेगाव मार्गावरील एका हॉटेलमध्ये जेवणाच्या थाळीवरून झालेल्या किरकोळ वादातून ग्राहकांना मारहाण केल्याची घटना ९ मार्च रोजी मध्यरात्री सुमारे १:१३ वाजता घडली. या प्रकरणी शेगाव ग्रामीण पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत निशांत भास्कर वक्टे (रा. अंबिकानगर, घाटपुरी नाका, खामगाव) यांनी शेगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादीनुसार, ते व त्यांचे काही मित्र हॉटेल बहिरम हंडी येथे जेवणासाठी गेले होते. त्यांनी पाचजणांसाठी जेवणाच्या थाळीची ऑर्डर दिली; मात्र आलोक बिलेवार यांनी फक्त दोनजणांसाठीच थाळी आणून दिल्याने उर्वरित लोकांना जेवण देण्याबाबत विचारणा केली असता वाद झाला. या वादातून आलोक बिलेवार यांच्यासह हॉटेलमधील कारागीर, गल्ल्यावर असलेली व्यक्ती तसेच काळा टी-शर्ट घातलेली आणखी एक व्यक्ती यांनी संगनमत करून फिर्यादी व त्यांच्या सहकाऱ्यांना लोखंडी पाइप व काठीने मारहाण केली तसेच शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या तक्रारीवरून शेगाव ग्रामीण पोलिसांनी संबंधित चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# महादेव खोरा परिसरातील वनराईला आग; अनर्थ टळला!

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**



शहराजवळील देऊळगाव राजा जाफराबाद बायपास मार्गालगत असलेल्या महादेव खोरा परिसरातील वनराईला आग लागल्याची घटना शनिवारी समोर आली. सामाजिक वनीकरण विभाग आणि नगरपालिकेच्या पुढाकारातून विकसित करण्यात आलेल्या या हरित पट्ट्यात आग लागल्याने परिसरातील झाडे आणि जैवविविधतेला धोका निर्माण झाला आहे. याप्रकरणी आग लागण्यामागे अज्ञात व्यक्तींचा हात असावा, असा संशय व्यक्त केला जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार,जाफराबाद बायपासलगतच्या वनक्षेत्रात सायंकाळच्या सुमारास अचानक आग लागल्याचे निदर्शनास आले. आग वेगाने पसरू लागल्याने स्थानिक नागरिक आणि स्वयंसेवी कार्यकर्त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत आग नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले.धरती बचाओ मिशन तसेच ग्लोबल इंडिया फ ेडरेशनच्या सदस्यांनीही घटनास्थळी पोहोचून आग नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न केले. वनश्री जनाबापू मेहेत्रे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनीही आग नियंत्रणात आणण्यासाठी मदत केली. नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनीही परिस्थितीची दखल घेत आग नियंत्रणात आणण्यासाठी आवश्यक यंत्रणा कार्यान्वित केली.८मार्च रोजी सायंकाळच्या सुमारास आगमहादेव खोरा परिसर हा शहरातील महत्त्वाचा हरित पट्टा मानला जातो. सामाजिक वनीकरण आणि विभाग नगरपालिकेच्या संयुक्त प्रयत्नांतून येथे मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यात आली

# राष्ट्रीय आरोग्य मेळाव्यात २ हजार ७८६ दिव्यांग बांधवांनी केली आरोग्य तपासणी




**जनसंचलन/बुलढाणा**

केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या संकल्पनेतून संपन्न झालेल्या राष्ट्रीय आरोग्य मेळाव्यात दिव्यांग बांधवांसाठी विशेष आरोग्य तपासणी व नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २ हजार ७८६ दिव्यांग बांधवांनी उस्फुर्त सहभाग नोंदवत साहित्याची नोंदणी केली. या दिव्यांग बांधवांना लवकरच साहित्याचे वाटप विशेष शिबिर घेऊन वितरित करण्यात येणार आहे. केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या संकल्पनेतून आयुष मंत्रालयाच्यावतीने राष्ट्रीय आरोग्य मेळावा संत नगरी शेगाव येथे नुकताच घेण्यात आला. या मेळाव्यामध्ये आयुष आयुर्वेद युनानी होमिओपॅथी उपचार पद्धतीच्या आरोग्य तपासण्या करण्यात आल्यात. या शिबिरात दिव्यांग बांधवांसाठी २७ फेब्रुवारीला आरोग्य तपासणी व साहित्य नोंदणी शिबिराचं आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये जिल्ह्याभरातील २ हजार ७८६ दिव्यांग बांधवांनी सहभाग नोंदवून आपली तपासणी व साहित्याची नोंदणी केली. राष्ट्रीय वयोश्री योजनेअंतर्गत दिव्यांग बांधवांना कर्णयंत्र, चालण्याची काठी, कंबरपट्टा, पायाचा पट्टा, व्हीलचेअर, इलेक्ट्रिक व्हीलचेअर असं जवळपास एका लाभार्थ्याला दहा हजार रुपयांचे साहित्य वितरित करण्यात येणार आहे. तसेच दिव्यांग बांधवांना कृत्रिम अवयवांचेही वितरण करण्यात येणार आहे. या शिबिरामध्ये दिव्यांग बांधवांसाठी लागणाऱ्या साहित्याची नोंदणी केल्या गेली त्यानुसार हे साहित्य उपलब्ध झाल्यानंतर विशेष शिबिर घेऊन हे सर्व साहित्य वाटप केल्या जाणार आहे. शिवाय खासदार निधी अंतर्गत ही काही साहित्यांचे वाटप याच दिवशी केल्या जाणार आहे . साहित्य वाटप शिबिराची तारीख जाहीर करून यासंदर्भातची माहिती सर्व दिव्यांग बांधवांना देण्यात येणार आहे. बांधवांनी नोंदविलेल्या कृत्रिम अवयव बनवण्याची प्रक्रिया ही सुरू झाली आहे, अशी माहिती केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयातून देण्यात आली आहे.

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | गुंतवणुक रक्कम ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८